## प्रेसनोट दि. ११.०९.२०२०

**श्री. राजेंद्र दिनकर पाटील वय ४९ वर्ष, ग्रामविकास अधीकारी भिलवडी, ता.पलुस जि. सांगली रा. दत्तनगर, कापूसखेड ता.वाळवा जि. सांगली यांना १२०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांनी त्यांचे जिल्हा परीषद सांगली कार्यालयामध्ये भिलवडी येथील मुस्लीम दफन भुमीचा शेडच्या दुरूस्ती कामाचे टेंडर भरले होते, सदरचे टेंडर मंजुर झालेनंतर तक्रारदार यांनी मुस्लीम दफन भुमी मधील शेडच्या बांधकामाचे ४०००००/- रूपयाचे काम पुर्ण केले परंतु सदर चे बिल तक्रारदार यांना अदयाप मिळाले नसल्याने त्यांनी ग्रामविकास अधीकारी श्री पाटील यांची भेट घेवुन वारंवार चौकशी केली परंतु श्री पाटील यांनी तक्रारदार यांना ४०००००/- रुपयाचे तीन टक्के प्रमाणे १२०००/- रुपये लाच रक्कम कामाचा चेक काढण्या करीता मागितले सदर चेक काढणेकरीता ग्रामविकास अधीकारी भिलवडी श्री. राजेंद्र दिनकर पाटील, यांनी तक्रारदार यांचेकडे १२०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.१०.०९.२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १०.०९.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री.पाटील ग्रामविकास अधीकारी भिलवडी यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे शेड दुरूस्ती कामाचे चेक काढणेकरीता १२०००/- रूपये लाचेची मागणी करून दुसरे दिवशी घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज रोजी भिलवडी ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी सापळा लावला असता श्री राजेंद्र दिनकर पाटील वय ४९ वर्ष, ग्रामविकास अधीकारी भिलवडी, ता.पलुस जि. सांगली रा. दत्तनगर, कापूसखेड ता.वाळवा जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १२०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री राजेंद्र दिनकर पाटील वय ४९ वर्ष, ग्रामविकास अधीकारी भिलवडी, ता.पलुस जि. सांगली रा. दत्तनगर, कापूसखेड ता.वाळवा जि. सांगली यांचे विरुध्द भिलवडी पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी अविनाश सागर, सुहेल मुल्ला, संजय संकपाळ, भास्कर भोरे, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, सलिम मकानदार, सिमा माने, राधीका माने, अजित पाटील चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in